नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - ७४<br>Issue - 74 | वार गुरुवार दि. ३१ जुलै २०२५<br>Blow- Thursday Date 31 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

## इस्त्रोने केले शक्तीशाली निसार मिशनचे प्रक्षेपण


### पृथ्वीचा तारणहार, संकट येण्याआधीच सांगेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीहरीकोटा : इस्रो आणि नासा यांनी संयुक्तपणे विकसित केलेला निसार लॉन्च करण्यात आला आहे. निसार उपग्रह हा मानवी कौशल्यांची देव-ाणघेवाण आणि तांत्रिक सहकार्याचा परिणाम आहे. जो दोन्ही अंतराळ संस्थांमध्ये एक दशकाहून अधिक काळ सुरू होता. यात महत्त्वाची गोष्ट ही आहे की, निसार पृथ्वीवर संकट येण्याआधीच माहिती देणार आहोत.

हा उपग्रह दर १२ दिवसांनी संपूर्ण पृथ्वीचे स्कॅनिंग करतो आणि भूकंप, त्सुनामी, ज्वालामुखी आणि भूस्खलन यासारख्या नैसर्गिक आपत्तींपासून सावध राहण्यास मदत करेल. ही १३,००० कोटी रुपयांची (१.५ अब्ज डॉलर्स) मोहीम असून इस्रोचे ७८८ कोटी रुपयांचे योगदान आहे. त्याचा डेटा जगभरातील शास्त्रज्ञ, सरकार आणि सर्वसामान्य जनतेला मोफत उपलब्ध होणार आहे.





निसारची तांत्रिक माहिती

प्रक्षेपण यान: इस्रोचे जीएसएलव्ही-एफ १६ रॉकेट. जीएसएलव्ही पहिल्यांदाच सूर्य-समकालिक कक्षेत उपग्रह घेऊन जाईल, जे सहसा पीएसएल्व्हीचे काम असते.

वजन: २,३९२-२,८०० किलो (एसयूव्ही आकाराचे).

कक्षा: ७४७ किमी उंची, सूर्य-समकालिक कक्षा, ९८.४ओ.

डेटा व्हॉल्यूम: दररोज ८० टेराबाइट डेटा, म्हणजेच १५० हार्ड ड्राइव्ह (५१२ जीबी).

अँटेना: नासाच्या जेट प्रोपल्शन लॅबोरेटरीने तयार केलेला १२ मीटर लांबीचा तारा-जाळीचा अँटेना.

वीज: ६,५०० वॅट वीज, जी मोठ्या सोलर पॅनेलमधून उपलब्ध होणार आहे.

भूकंप आणि ज्वालामुखी: निसार जमिनीच्या पृष्ठभागाच्या लहान हालचाली मोजू शकतो. यात भूकंपापूर्वी फॉल्ट लाइन्समधील (पृथ्वीच्या क्रॅक) हालचाली टिपल्या जातात. ज्या ठिकाणी भूकंपाचा धोका जास्त आहे अशा ठिकाणांना हे चिन्हांकित करू शकते. त्सुनामी : त्सुनामीच्या इशाऱ्यासाठी भूकंपाची अचूक माहिती आवश्यक असते. निसार भूकंपापूर्वी आणि नंतर जमिनीच्या हालचालींची माहिती देईल, ज्यामुळे त्सुनामीच्या संभाव्यतेचा अंदाज बांधण्यास मदत होईल. तसेच किनारपट्टी भागातील पूरस्थितीवर ही समिती लक्ष ठेवणार आहे. भूस्खलन: निसार डोंगराळ भागातील माती आणि खडकांची हालचाल पकडू शकते, त्यामुळे भूस्खलनाचा धोका अगोदरच ओळखता येतो. भारतासारख्या देशांसाठी हे खूप महत्वाचे आहे, जिथे हिमालयीन प्रदेशात भूस्खलन होते.

पूर आणि वादळे: निसार नदी आणि तलावांमधील जमिनीतील ओलावा आणि पाण्याची पातळी मोजू शकते. हे पुराच्या वेळी पाण्याच्या प्रसाराचा मागोवा घेईल, ज्यामुळे मदत कार्यात मदत होईल. तसेच वादळांच्या प्रभावावर ही नजर ठेवली जाणार आहे. २४ तास पृथ्वीचे फोटो काढू शकते. इस्रो आणि नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन यांच्यातील अशा प्रकारची ही पहिलीच भागीदारी आहे. ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण यान द्वारे सामान्यत: वाहून नेल्या जाणाऱ्या ऋड्डत्त रॉकेटद्वारे सूर्य-समकालिक ध्रुवीय कक्षेत उपग्रह पाठविण्याची ही पहिलीच वेळ आहे.

## लडाखमध्ये भारतीय सैन्याच्या वाहनावर दरड कोसळली, दोन जवान शहीद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लेह : लडाखमध्ये मोठी दरड कोसळल्याची घटना घडली आहे. ज्यामध्ये लष्कराच्या ताफ्यातील वाहन दरडीखाली आले आणि दुर्घटना घडली. यामध्ये दोन जवानांचा मृत्यू झाला आहे. बुधवारी सकाळी ही घटना घडल्याची अधिकाऱ्यांनी पुष्टी दिली आहे.

लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, ३० जुलैला सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास लडाखच्या खोऱ्यांत ही घटना घडली आहे. एक मोठी दरड कड्यावरुन खाली कोसळली आणि लष्कराच्या ताफ्यातील एका वाहनावर आदळली. वाहनातील दोन जवानांना आपला प्राण गमवावा लागला आहे.



शहीद जवानांची ओळख लेफ्टनंट कर्नल भानू प्रकाप सिंग आणि लान्स दफादार दलजीत सिंग अशी झाली आहे. या प्रदेशात कार्यरत असलेल्या एका युनिटमध्ये ते काम करत होते. अपघातात त्यांनी गंभीर दुखापत झाली, ज्यामुळे त्यांची प्राणज्योत मालवली आहे. त्यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबाचा मोठा आधार हरपला आहे.

भारतीय लष्कराच्या फायर अँड फ्युरी कॉर्प्सने एक्स हँडलवर पोस्ट केली आहे की, ३० जुलै २०२५ ला सकाळी ११.३० वाजता लडाखमध्ये एका लष्करी वाहनाच्या ताफ्यावर एका कड्यावरुन मोठी दरड कोसळली. परिस्थिती पूर्वपदावर आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. यासोबतच कॉर्प्सने शहीद जवानांना श्रद्धांजली वाहिली आहे.

शहीद जवानांना श्रद्धांजली वाहताना म्हटले की, 'जीओसी फायर अँड फ्युरी आणि सर्व रँक लेफ्टनंट कर्नल भानू प्रताप सिंग आणि लान्स दफादार यांनी सलाम करत आहोत. ३० जुलैला देशसेवेचे कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान दिले आहे. या दु:खद प्रसंगी शोकाकुल कुटुंबाप्रती तीव्र संवेदना आम्ही व्यक्त करतो.'

अधिकाऱ्यांनी सांगितले घटनास्थळी परिस्थिती पूर्वपदावर आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. पण लष्कराने ताफ्याच्या बाबतीत तसेच अन्य अधिकाऱ्यांच्या बाबत आणखी काही माहिती जारी केलेली नाही.

## मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा आज निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: आरोपींचे वेगवेगळ्या कायदेशीर मुद्द्यांवर एकामागोमाग अर्ज, मुंबई उच्च न्यायालय सर्व सर्वोच्च न्यायालयात अपिले, तपाससंस्थांमधील बदल, खटल्याची सुनावणी करणाऱ्या न्यायाधीशांच्या बदल्या अशा अनेक कारणांमुळे प्रदीर्घ रखडपट्टी झालेल्या मालेगाव बॉम्बस्फोट-२००८ या प्रकरणाचा निकाल अखेर आज, गुरुवारी जाहीर होणार आहे. मुंबई सत्र न्यायालय इमारतीतील विशेष एनआयए न्यायालयाचे न्यायाधीश ए. के. लाहोटी हे हा बहुचर्चित निर्णय सकाळी ११ वाजता सुनावणार आहेत.

रमझानच्या महिन्यात २९ सप्टेंबर २००८ रोजी रात्री ९.३५ वाजता मालेगावमधील मशिदीजवळ एलएमएल फ्रीडम मोटारसायकलमध्ये लावलेल्या बॉम्बचा भीषण स्फोट होऊन हाहाकार उडाला होता. या घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला, तर १०१ जण जखमी झाले. 'सन २००३पासून सक्रिय झालेल्या अभिनव भारत या संघटनेच्या सदस्यांनी धार्मिक तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने हा बॉम्बस्फोट घडवला. त्यासाठी आरोपी लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहितने काश्मीरमधून आरडीएक्स आणले', असा आरोप ठेवण्यात आला आहे.

निकालाच्या पार्श्वभूमीवर मालेगावी वाढीव पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शहरात स्थानिक पोलिस यंत्रणेसह अतिरिक्त दहा अधिकारी, शंभर कर्मचाऱ्यांसह दोन राज्य राखीव दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्याने शहराला छावणीचे स्वरूप आले आहे.

### रशियाकडून शस्त्र खरेदी केले म्हणूनही आकारला दंड

## अमेरिकेने भारतावर लावला २५ टक्के टॅरिफ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत-अमेरिका संबंधाबाबत मोठी बातमी समोर येत आहे. अमेरिकेने भारतावर तब्बल २५ टक्के टॅरिफ लावला आहे. भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तूंवर अमेरिकेने २५ टक्के टॅरिफ लावला आहे. यामुळे अमेरिकेत भारतीय वस्तू महाग होणार आहेत. त्याचा परिणाम भारताच्या व्यापाऱ्यावर होणार आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ लावल्यानंतर 'एक्स'वर प्रतिक्रिया दिली आहे. भारत आणि अमेरिका संबंधांमध्ये सारं काही आलबेल नाही, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. खरंतर भारत-अमेरिका संबंध ताणण्यामागे गेल्या काही महिन्यांपासूनच्या घडामोडी कारणीभूत आहेत. भारत-पाकिस्तान युद्ध हे आपल्यामुळे थांबलं, असा दावा डोनाल्ड ट्रम्प यांनी केला होता. पण भारताने ते नाकारलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कालच लोकसभेत कोणत्याही नेत्याच्या सांगण्यावरुन आपण निर्णय घेतना नाही, असं म्हटलं. यानंतर आज अमेरिकेने भारतावर २५ टक्के टॅरिफ लावले आहे. येत्या १ ऑगस्ट पासून भारतीय वस्तूंवर २५ टक्के टॅरिफ आकारले जाणार आहे.



भारत हा आपला मित्र देश असला तरी, आपण त्यांच्याशी तुलनेने कमी व्यावसाय केला आहे. त्यांचे आयात शुल्क जगातील सर्वात जास्त आहे आणि त्यांच्याकडे सर्वात कठीण आणि त्रासदायक गैर-आर्थिक व्यापार अडथळे आहेत.

तसेच, त्यांनी नेहमीच त्यांचे बहुतांश लष्करी साहित्य रशियाकडून खरेदी केलं आहे. ते रशियाचे ऊर्जेचे सर्वात मोठे खरेदीदार आहेत, चीनसह, ज्यावेळी सर्वजण रशियाला युक्रेनमधील हिंसा थांबवण्यास सांगत आहे. हे सर्व काही चांगले नाही. त्यामुळे भारताला १ ऑगस्टपासून २५ टक्के आयात शुल्क तसेच वरील कारणांसाठी दंड आकारला जाईल, अशी भूमिका डोनाल्ड ट्रम्प यांनी मांडली आहे.

आंतरराष्ट्रीय घडामोडींचे विश्लेषक शैलेंद्र देवळाणकर यांनी अमेरिकेच्या निर्णयावर प्रतिक्रिया दिली आहे. गेल्या काही दिवसांपासूनच्या घडामोडी पाहता डोनाल्ड ट्रम्प हे भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करत असल्याचं त्यांचं म्हणणं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांची ही दबाव आणण्यासाठी रणनीती आहे. त्यांनी याआधीदेखील अनेक देशांना अशाप्रकारचा टॅरिफ लावला. पण त्यानंतर लगेच त्यांनी आपला निर्णय मागे घेतला होता. त्यांनी चीनवर तर सर्वाधिक टॅरिफ लावला होता. पण नंतर त्यांनी पुन्हा तो निर्णय मागे घेतला होता. भारताने नुकतंच ब्रिटनसोबत एक व्यापारी करार केला आहे. त्याचादेखील डोनाल्ड ट्रम्प यांना त्रास झाला असेल यामुळे त्यांनी अशाप्रकारचा निर्णय घेतला असावा, असादेखील अंदाज वर्तवला जात आहे.

प्रथम पुण्यस्मरण



स्मृतीशेष - रेश्मा भगवान गोतसुर्वे
(मृत्यू दि. ३१/०७/२०२४)

आठवण येती क्षणोक्षणाला
का आम्हाला सोडून गेला,
चुकलं काही समजलं नाही
धीर द्यावे कसे मनाला...

पिले ही राहती रमल्या सारखी
किती समजदार मोत्या सारखी,
विसरू ना आम्ही कधी ना तुम्हा

पुनर्जन्म घ्यावे लागेलच तुम्हा...
आपल्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन !

शोकाकुल :- भगवान लक्ष्मणराव गोतसुर्वे (पती ),श्रीमती जनाबाई लक्ष्मणराव गोतसुर्वे( सासू ),श्रीमती सुभाबाई लक्ष्मणराव गोतसुर्वे (सासू ),श्रीमती नागूबाई पांडुरंग शिंदे (आई ), सौ.मीनाक्षी कैलास गायकवाड, सौ. ऐश्वर्या (हौशा) राजन वाघमारे, बलवान लक्ष्मणराव गोतसुर्वे, चिंतन लक्ष्मणराव गोतसुर्वे, जितेंद्र लक्ष्मणराव गोतसुर्वे, सौ गौतमी बलवान गोतसुर्वे,सौ श्रीदेवी चिंतन गोतसुर्वे , सौ, शीतल जितेंद्र गोतसुर्वे, श्रेयांश, क्षितीजा,देविका,प्रणित,सौमित, कुंजल

समस्त गोतसुर्वे परिवार आचेगांव

गुरवार दिनांक ३१/०७/२५ रोजी सकाळी वृक्षारोपण व सायंकाळी ६.०० वा.पुण्यस्मरण विधी कार्यक्रम
स्थळ :-स्वगृही आचेगांव

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### ट्रम्प टॅरिफ

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातून येणाऱ्या सर्व वस्तूंवर २५% आयात शुल्क लादण्याची घोषणा केली आहे. याशिवाय रशियाकडून लष्करी उपकरणे आणि कच्चे तेल खरेदी केल्यास या ढरीळषष व्यतिरिक्त दंड किंवा पेनल्टी आकारण्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे अमेरिकेतील स्मार्टफोन, औषधे, कापड, चामडे, ऑटो पार्ट्स आणि दागिने यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये किमती वाढण्याची अपेक्षा असून भारतावरील अमेरिकेचे कर आणि दंड १ ऑगस्टपासून लागू होणार आहेत. चीननंतर भारत हा रशियन तेलाचा सर्वात मोठा खरेदीदार आहे. पण अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये भारताला आपला 'मित्र' म्हणून संबोधले. ट्रम्प यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले की, भारत आमचा मित्र आहे, पण गेल्या काही वर्षांत आम्ही त्यांच्याशी तुलनेने कमी व्यापार केला आहे कारण त्यांचे शुल्क खूप जास्त आहे, जे जगातील काही सर्वात जास्त आहे. तसेच, रशियाने युक्रेनमध्ये हत्या थांबवावी अशी प्रत्येकाची इच्छा आहे तेव्हा भारताने रशियाकडून त्यांची लष्करी उपकरणे आणि ऊर्जा उत्पादने खरेदी केली आहेत. भारताने २०२३ मध्ये अमेरिकेला २.२ अब्जचे ऑटो पार्ट्स निर्यात केले होते ज्यामध्ये इंजिन पार्ट्स, ब्रेक, गियर असेंब्ली आणि वायरिंग हार्नेस यांचा समावेश आहे. अमेरिकन ऑटो भारतीय घटकांवर अवलंबून आहेत याआधी अनेक अहवालातून समोर आले आहे त्यामुळे आता २५% टॅरिफमुळे अमेरिकेत कार दुरुस्तीचा खर्च वाढू शकतो. गेल्या काही दिवसांपासूनच्या घडामोडी पाहता डोनाल्ड ट्रम्प हे भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करत असल्याचं त्यांचं म्हणणं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांची ही दबाव आणण्यासाठी रणनीती आहे. त्यांनी याआधीदेखील अनेक देशांना अशाप्रकारचा टॅरिफ लावला. पण त्यानंतर लगेच त्यांनी आपला निर्णय मागे घेतला होता.

# प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण: बेघर व्यक्तीसाठी एक महत्त्वकांक्षी योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सर्वसामान्य नागरिकांचे स्वयंभू आणि सुरक्षित निवासाचे स्वप्न साकार करण्यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेली प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ही एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. भारताचे मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सबके लिए घर हे स्वप्न साकार करण्याचा संकल्प केला असून, त्या दिशेने प्रभावी पावले टाकली जात आहेत. राज्यात माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या योजनेचे टप्पा-२ प्रभावीपणे राबवले जात असून महाराष्ट्रासाठी २० लाख घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

**जिल्हा उद्दिष्ट –**

सोलापूर जिल्ह्याने या योजनेच्या अंमलबजावणीत उल्लेखनीय प्रगती साधलेली आहे. मागील सात वर्षात जिल्ह्यातील ग्रामीण भागात एकूण ४१ हजार ३७४ घरकुलांचे पूर्ण काम यशस्वीपणे पूर्ण झाले असून यामुळे हजारो कुटुंबांना सुरक्षित निवास उपलब्ध झाला आहे. सन २०२४-२५ साठी जिल्ह्याला ६२ हजार ९५० घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झालेले असून त्यातील १ हजार १०० घरकुलांची पूर्णता झाली आहे आणि ६२ हजार ३९४ घरकुलांची कामे विविध टप्प्यात सुरू आहेत. जिल्ह्यातील बेघारांना लवकरात लवकर घरकुल उपलब्ध होतील यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे हे संबंधित यंत्रणाकडे सातत्याने पाठपुरावा करून बेघारांच्या घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.




**अनुदानवाढ आणि सूर्यघर योजना**

राज्य सरकारने योजनेत केलेल्या सुधारित निर्णयानुसार लाभार्थ्यांना मिळणाऱ्या अनुदानामध्ये ₹५० हजार पर्यंत वाढ करण्यात आली आहे. यामध्ये ₹३५ हजार हे घरकुल बांधकामासाठी तर ₹१५ हजार हे सौरऊर्जेच्या सूर्यघर योजनेअंतर्गत सोलार पॅनेल बसविण्यासाठी देण्यात येणार आहेत. यामुळे लाभार्थ्यांना मोफत वीजप्रवाह मिळणार असून ऊर्जा स्वावलंबनही साधले जाणार आहे.

**नवीन सर्वेक्षणाची गरज**

योजनेच्या प्रभावीतेसाठी आवास प्लस २०२४ अंतर्गत नवीन सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. हे सर्वेक्षण पूर्णपणे डिजिटल व पारदर्शक पद्धतीने राबवले जात असून शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत स्तरावरील अधिकारी यांची सक्रिय सहभागिता अत्यावश्यक ठरते. हे सर्वेक्षण संपूर्ण जिल्ह्यातील प्रत्येक बेघर लाभार्थीपर्यंत योजना पोहोचवण्यासाठीचे महत्त्वाचे पाऊल आहे. यामध्ये कोणताही गरजवंत नागरिक वंचित राहू नये यासाठी सर्व यंत्रणांनी सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हे नवीन सर्वेक्षण अत्यंत प्रभावीपणे करत आहे.

**योजनेची व्याप्ती व वैशिष्ट्ये**

■ गरजूंना दर्जेदार बांधकामाचे घर उपलब्ध करणे

■ बांधकामामध्ये शाश्वत व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर

■ सौर ऊर्जा जोडणीद्वारे वीजपुरवठा सुनिश्चित करणे

■ स्थानिक रोजगार निर्मिती व कौशल्य प्रशिक्षणाचे संधी

■ सामाजिक समावेश व महिलांच्या नावे मालमत्तेची नोंदणी

■ घराचा किमान आकार: २५ (२६९) चौरस मीटर, स्वयंपाकासाठी स्वतंत्र जागा

■ ₹१ लाख २० हजार पर्यंत आर्थिक सहाय्य सपाट भागासाठी

■ ₹ १२ हजार शौचालयासाठी डइच-ऋ अंतर्गत

■ ९० दिवसांचा रोजगार मनरेगा अंतर्गत

■ एलपीजी कनेक्शन, वीज, पाणी, कचरा व्यवस्थापन यासाठी इतर योजनांशी समन्वय

या सर्व घटकांमुळे प्रधानमंत्री आवास योजना ही फक्त निवास प्रदान करणारी नव्हे, तर समाजघटकांचे जीवनमान उंचावणारी आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करणारी योजना बनली आहे.

**शासकीय यंत्रणांचे सहकार्य**

सोलापूर जिल्ह्यातील यशस्वी अंमलबजावणीत महसूल विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामसेवक, तलाठी, उपअधीक्षक, बांधकाम विभाग यांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

*जनजागृती आणि पारदर्शकता

सर्वसामान्य नागरिकांपर्यंत योजनेची माहिती पोहोचवण्यासाठी स्थानीय व राज्यस्तरीय माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. विविध माध्यमांद्वारे माहितीपत्रके, फलक, सामाजिक प्रसारमाध्यमे व जनसंवाद सत्रांद्वारे योजनेचे फायदे नागरिकांपर्यंत पोहोचवले जात आहेत.

सोलापूर जिल्ह्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पुढील काळात सर्वसामान्य नागरिकांच्या सहभागाची गरज आहे. गावपातळीवरील सर्वेक्षण, लाभार्थी सत्यापन, अनुदान प्रक्रिया आणि बांधकाम नियंत्रण यासाठी अधिक सक्षम व्यवस्थापन तंत्रज्ञानाची जोड देणे गरजेचे आहे. यासोबतच नव्या उपयोजनांची अंमलबजावणी करत नागरिकांमध्ये विश्वास आणि आत्मनिर्भरतेची भावना निर्माण केली जाईल.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (टप्पा-२) ही सोलापूर जिल्ह्यासाठी एक सामाजिक परिवर्तनाची चळवळ ठरत असून, घरकुलाचा लाभ फक्त भिंतींच्या बांधकामापुरता न राहता सुरक्षिततेचा, सन्मानाचा आणि उज्ज्वल भविष्याचा आधारस्तंभ बनतो. जिल्ह्याला यशस्वी कामगिरी करून येत्या वर्षात हे उद्दिष्ट पूर्णत्वास नेण्यासाठी सर्व स्तरावरील सहकार्य आवश्यक आहे.

**– सुनिल सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर**

# आधुनिक पत्रकारिता : संधी, आव्हाने आणि उत्तरदायित्व
## (सोलापूर येथे आयोजित चर्चात्मक कार्यशाळेचा सविस्तर वेध)

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



तांत्रिक क्रांती, माहितीचा विस्फोट, आणि बदलत्या सामाजिक वास्तवाच्या पार्श्वभूमीवर पत्रकारितेचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. या नव्या युगात सत्यनिष्ठा, पारदर्शकता आणि सामाजिक भान जपत निष्पक्ष पत्रकारिता करणे हे मोठे आव्हान बनले आहे. अशाच प्रश्नांची सखोल चर्चा आणि विचारमंथन आधुनिक पत्रकारिता : संधी आणि आव्हाने या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत सोलापूर येथे पार पडली.

कार्यशाळेचे आयोजन पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सामाजिक शास्त्र संकुल, जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर, आणि श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने नियोजन भवन, सोलापूर येथे करण्यात आले.

**उद्घाटन सत्र : परिवर्तनाच्या दिशादर्शक छटा**

कार्यशाळेचे उद्घाटन इंडिया टुडे, मुंबईचे ज्येष्ठ पत्रकार श्री. अभिजीत कारंडे यांच्या हस्ते झाले. त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, पत्रकारितेला संघर्ष नवा नाही, मात्र नवी आव्हाने आता अधिक गुंतागुंतीची झाली आहेत. माहितीचा भडीमार, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सोशल मीडियाचे स्वरूप यामुळे पत्रकाराची जबाबदारी अधिक संवेदनशील झाली आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षीय भाषणात, त्यांनी माहिती सत्यतेची पडताळणी, घाईगडबडीत चुकीची माहिती देण्याचे दुष्परिणाम, आणि निर्भय पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित केले. सत्य मांडणारी पत्रकारिता हीच समाजाचा विश्वास टिकवते, असे ते म्हणाले.

विचारमंचावर महेश रामदासी (दिव्य मराठी), प्रशांत माने (तरुण भारत), रघुवीर शिराळकर (पुण्यनगरी), पुरुषोत्तम कुलकर्णी (सुराज्य), प्रा. डॉ. गौतम कांबळे, डॉ. प्रभाकर कोळेकर, व विक्रम खेलबुडे यांची उपस्थिती होती.

चर्चासत्र : संधींचा वेध आणि आव्हानांची चिकित्सा

कार्यशाळेच्या विविध सत्रांमध्ये उल्लेखनीय वक्त्यांनी पत्रकारितेच्या विविध पैलूंवर सखोल विवेचन केले:

१. डिजिटल पत्रकारितेचे प्रभाव – श्री. निलेश झालटे

आज स्थानिक बातम्या जागतिक व्यासपीठावर पोहोचत आहेत, असे प्रतिपादन त्यांनी केले. माहितीच्या पूरात वस्तुनिष्ठता आणि सत्यतेचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी आधुनिक पत्रकाराच्या जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या.

२. पत्रकारिता आणि सामाजिक भान – श्री. घनश्याम पाटील

साहित्य चपराक पुणेचे संपादक श्री. पाटील म्हणाले, पत्रकारांनी सामाजिक जनजागृतीसाठी परखड आणि धाडसी मत व्यक्त करणे गरजेचे आहे. त्यांनी नाविन्यपूर्ण पत्रकारितेच्या संधींचा उल्लेख करत सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीकोनातून संवाद साधला.

३. प्रशिक्षण व नव्या अभ्यासक्रमाची गरज – श्री. अभिजीत कारंडे

पत्रकारितेतील झपाट्याने होणाऱ्या बदलांमुळे विद्यापीठांनी अभ्यासक्रमात नवे तत्त्व जोडण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून बातमीचा मागोवा घेणे ही पत्रकारितेची खरी कसोटी आहे, असे त्यांनी नमूद केले.

४. संवादाचे बदलते स्वरूप – श्री. सिद्धाराम पाटील

वाचन संस्कृती जपणे आणि संवादात नवतंत्र आत्मसात करणे हे आजच्या पत्रकाराचे कार्य आहे, असे दैनिक सकाळचे सहयोगी संपादक श्री. पाटील यांनी स्पष्ट केले.

**कृत्रिम बुद्धिमत्ता : संधी आणि नैतिकता**

कार्यशाळेत ख, डेटा विश्लेषण आणि फॅक्ट चेकिंग यावरही चर्चा झाली. श्री. महेश रामदासी यांनी ख ही केवळ संधी आहे, नव्हे तर जबाबदारीचे साधन आहे, असे प्रतिपादन करत तंत्रज्ञानाचा विचारशील उपयोग सुचवला. तर डॉ. मोघे यांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या पत्रकारांसाठी असलेल्या योजनांची माहिती दिली.

**पत्रकारितेचे मूल्य : विश्वास, निर्भयता आणि तटस्थता**

कार्यशाळेत अनेक वक्त्यांनी एकच सांगोपांग संदेश दिला – पत्रकारितेची खरी कसोटी ही विश्वासार्हता, तटस्थता आणि सत्याशी निष्ठा यात आहे. श्री. मिलिंद कुलकर्णी म्हणाले, जुनी व नवी पत्रकारिता असे भेद नाहीत; बोलीभाषेतील आणि लोकाभिमुख पत्रकारिता हीच प्रभावी ठरते.

संजय पाठक यांनी इशू-बेस्ड पत्रकारितेचे महत्त्व सांगून नाविन्य आणि अद्ययावतता यावर भर दिला. जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांनी वाचन कौशल्य आणि शब्द संपत्ती यांच्या योगदानाची जाणीव उपस्थितांना करून दिली.

**समारोप आणि प्रमाणपत्र वितरण**

कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा (प्र-कुलगुरू, सोलापूर विद्यापीठ) यांनी अध्यक्षीय भाषणात आधुनिक पत्रकारितेच्या नव्या वाटा उलगडल्या. प्रा. डॉ. अंबादास भासके यांनी सूत्रसंचालन आणि आभार मानले, तर सागर सुरवसे, किरण बनसोडे यांच्यासह श्रमिक पत्रकार संघाच्या टीमने नियोजनाचे कौतुकास्पद संयोजन केले.

**निष्कर्ष : पत्रकाराचा आजचा आणि उद्याचा चेहरा**

या चर्चात्मक कार्यशाळेचा व्यापक निष्कर्ष असा की – पत्रकारिता केवळ माध्यम नव्हे, ती एक सामाजिक प्रक्रिया, एक लोकशाहीचा स्तंभ, आणि सत्य प्रकाशाचा वाहक आहे. बदलत्या काळात पत्रकाराने तंत्रज्ञान आत्मसात करावे, संवाद सशक्त करावा, आणि समाजाशी नातं टिकवून ठेवावे.


आधुनिक पत्रकारितेमध्ये असंख्य संधी आहेत – परंतु त्या संधींचे सामाजिक उत्तरदायित्व आणि नैतिक अधिष्ठान हेच खरे आव्हान आहे.

**– सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर**

# अण्णा भाऊ साठे आणि आधुनिक विचार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुकाराम अर्थात अण्णा भाऊ साठे यांचा जन्म एक ऑगस्ट १९२० रोजी वाटेगाव तालुका वाळवा जिल्हा सांगली येथे झाला व त्यांचा मृत्यू १८ जुलै १९६९ ला मुंबईत झाला. उणे पुरे पन्नास वर्षाचे आयुष्य अण्णा भाऊला लाभले. अण्णाभाऊ हे एक असे साहित्यिक आहेत की ज्यांचा पुतळा परदेशात उभारला गेलेला आहे. अण्णाभाऊंनी कथा,लघुकथा,कादंबरी,वगनाट्य, लावणी, चित्रपट कथा,पोवाडा, प्रवास वर्णन असे विविध साहित्यप्रकार प्रभावीपणे हाताळले. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य अजरामर झाले.



**बालपणाची जडणघडण**

दहा-बारा वर्षाचा तुकाराम मुंबईच्या दिशेने निघाला होता त्याचवेळी किंवा त्याच दरम्यान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर इंग्लंडमध्ये गोलमेज परिषदेमध्ये दलितांचे दुःख दैन्य मांडून त्यांच्या हक्कांसाठी लढत होते. मुंबईच्या वास्तव्यामध्ये अण्णाभाऊंनी कामगार चळवळ अतिशय जवळून पाहिली. तारुण्याच्या उंबरठ्यावर उभा राहण्यापूर्वीच हा वाटेगाव चा तुकाराम कम्युनिस्ट विचारसरणीचा अनुयायी बनला. पॅम्पलेट्स वाटणे,हॅण्डबिल वाटणे,मोर्चे,संप,हरताळ यशस्वी करण्याच्या दृष्टीने पोस्टर्स रंगविणे, डकविणे,रस्त्यावर घोषणा लिहिणे, सभा संमेलनाच्या आयोजन करणे अशी अनेक कामे लहान मुलेच करायची तुकाराम यात रंगून गेला व कमालीच्या वेगाने बदलत राहिला. याच काळात तो साक्षर झाला.

तुकाराम मुळचाच गोड गळ्याचा होता, लोकगीते व लोककथांचा फार मोठा साठा तुकारामच्या ओठावर होता, तल्लख बुद्धीचा तुकाराम थोड्याच दिवसात मुंबईतील कम्युनिस्ट विचारसरणीच्या तरुण वर्तुळात आवडता बनला, ठरल्यावेळी तो आला नाही तर त्याचे तरुण सहकारी धावत यायचे घराच्या बाहेर उभा राहून पुकारायचे तुकाराम.... जाई व शंकर ही भावंडे घराच्या बाहेर येऊन पाहायचे अन जाई म्हणायची अण्णा घरात नाही तर शंकर म्हणायचा भाऊ घरात नाही मग अनेकांना हा अण्णा कोण हे उमगायचेच नाही. नागपूरच्या दिनकर नावाच्या तिक्ष्णबुद्धीच्या तरुणाला हे नाव ठीक वाटले आणि त्या वेळपासून वाटेगावचा तुकाराम भाऊ साठे हा मुंबईत अण्णा भाऊ साठे या नावाने ओळखला जाऊ लागला तुकारामचे अण्णा हे नामांतरच झाले नाही तर अण्णा भाऊंचे वाटेगाव ते मुंबई हे जाणीवांतर ही झालेले दिसते.

गुणवत्ता आणि प्रतिभा ही विशिष्ट जातीची किंवा धर्माची मक्तेदारी नसते हे आपल्या लेखणीने यांनी सिद्ध करून दाखविले. जगद्गुरु संत तुकारामांनी तुकाराम गाथा लिहून समाजातील अंधश्रद्धा, विषमता यावर कोरडे ओढले तर साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून अंधश्रद्धा,विषमता,वर्ग व्यवस्था यावर कथा,कादंबरी,लोकनाट्य व पोवाडा या माध्यमातून कोरडे ओढले. म्हणजेच अण्णा भाऊंनी बहुजन गाथा मांडली असे प्रा.शरद गायकवाड यांनी नोंदवले आहे.

**चळवळीतील जडण घडण**

अण्णाभाऊंची जडणघडण साम्यवादी चळवळीमध्ये झालेली आहे. मुंबईच्या कामगार वस्तीमध्ये होणारे संप,मोर्चे, हरताळ यांचे कामगारांच्या जीवनावर होणारे उलट सुलट परिणाम हे लहानपणीच अण्णाभाऊंच्या मनावर बिंबवलेले होते. १९४४ साली टिटवाळा येथे शेतकरी परिषद भरली होती या शेतकरी परिषदेमध्ये अण्णाभाऊ साठे,अमर शेख,ग. ना गव्हाणकर या तिघांनी मिळून लालबावटा कला पथकाची स्थापना केली. या कला पथकाच्या माध्यमातून श्रमिक,शेतमजूर,दलित यांच्यामध्ये वैचारिक जागृती निर्माण करण्याचं काम केलेले दिसते.

याच शाहिरी त्रिकुटाने संयुक्त महाराष्ट्राचे चळवळ गाजवली. याच चळवळीतील माझी मैना गावाकडे राहिली ही अण्णाभाऊंची लावणी अजरामर झालेली दिसून येते. पण संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर अण्णाभाऊ साठे हे दुर्लक्षित राहिलेले दिसतात. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील त्यांचे योगदान हे विसरता येत नाही.

**विज्ञानवादी दृष्टिकोन**

अण्णा भाऊंनी साहित्यातून आणि वाणीतून वैज्ञानिक दृष्टिकोन मांडलेला दिसून येतो. पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना उद्घाटक म्हणून अण्णाभाऊंनी, पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे. हा विचार मांडला त्यांचा हा विचार प्रस्थापित व्यवस्थेला हादरवणारा आहे. दुसरे असे की तमाशा मधून म्हणजेच लोकनाट्य मधून सुरुवातीला गणेशाला नमन किंवा वंदन करण्याचा पायंडा होता. सातारा जिल्ह्यातील रेठरे बुद्रुक येथील श्रीधर बाळकृष्ण कुलकर्णी उर्फ पट्टे बापूराव यांनी गणपती स्तवन हे तमाशामध्ये आणले होते ते अण्णाभाऊंनी बंद केले.तो पायंडा किंवा प्रथा अण्णाभाऊंनी मोडली. म्हणजेच अण्णा भाऊंनी देव, अंधश्रद्धा नाकारले असेच म्हणावे लागेल अण्णाभाऊंनी गणपती नाकारला हे अण्णाभाऊंच्या अनुयायांनी गणेशोत्सवात भाग घेताना लक्षात घेतले पाहिजे. हे प्रस्थापित रूढी,परंपरा,प्रथा नाकारताना अण्णाभाऊंनी काय स्वीकारलं हे लक्षात घ्यावे. त्यांनी गणपती नाकारला आणि मातृभूमी, महापुरुष,कष्टकरी,श्रमिक यांना वंदन केले.



**साहित्यातून संदेश**

अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून कोणता संदेश दिला हे ही विचारातील घेतले पाहिजे. एक-दोन दिवसाची शाळा शिकलेले अण्णाभाऊ यांनी मुंबईमध्ये हमाली, कुत्री सांभाळणारा,लाईटीच्या तारा ओढणारा, सिनेमाची पोस्टर लावणारा,गिरणी कामगार, पाईपलाईनचे खड्डे खोदणारा, लोकांची वसुली करून देणारा दादा अशी अनेक प्रकारचे कामे करून ते अनुभव संपन्न झाले होते याचे प्रतिबिंब त्यांच्या अनेक साहित्यकृती मधून दिसून येते. त्यांनी जवळपास ९७ साहित्यकृती निर्माण केल्या. अण्णाभाऊंनी आपले साहित्य मन,मनगट,मनका व मस्तक मजबूत करण्यासाठी लिहिलं. अण्णाभाऊंनी क्रांतिकारी साहित्य निर्माण केले त्यांचे नायक बंडखोर होते. काहीच न शिकलेल्या अण्णाभाऊंनी रशियातील मास्को शहरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे यातच त्यांचे मोठेपण आपल्याला दिसून येते.

प्रस्थापित साहित्यिक शृंगारिक लावण्या लिहीत होते तर अण्णाभाऊ मुंबईची लावणी लिहीत होते. म्हणजेच अण्णाभाऊंनी प्रस्थापित साहित्यिकांनाही चपराक दिलेली दिसते. आज आर.एस.एस.व सावरकर भक्तांच्या नादाला लागलेल्या अनुयायांनी अण्णाभाऊ आपल्या साहित्यातून काय सांगत होते हे नीट समजून घ्यावे.शिवारी चला या पद्य रचनेत अण्णाभाऊ म्हणतात की,

**सावरकर शाहीचा विखारी कुंदा**
**आरपार खुरपून पाडायचा रेंदा**
**दाखवया बाळा ...उचल घे वेळा**
**पोलादी पाहून आपला रे शिवारी चला ।।**

सावरकर शाही चा कुंदा मुळासकट खुरपून काढण्यासाठी हातात वेळा घे असे अण्णाभाऊ का म्हणतात हे आपण हुशारीने जाणून घेऊन सद्यस्थितीत विचार करणे आवश्यक वाटते.

**तुम्ही चळू नका**
**कोणी वळू नका**
**मागं पळू नका**
**बिनी मारायची अजून राहिली**
**माझ्या जीवाची होतीया काहीली**

अण्णाभाऊंना कोणती बिन्नी मारायची होती याचा विचार आपण केला पाहिजे. अण्णाभाऊ असं का म्हणाले?

**जग बदल घालुनी घाव**
**सांगून गेले मला भीमराव**

हा घाव कशावर घालायचा होता? याचा विचार आपण अण्णाभाऊच्या सर्व अनुयायांनी करणे आवश्यक आहे.

आज अण्णाभाऊ साठे यांची जयंती महाराष्ट्रभर साजरी केली जात असली तरी त्याची सुरुवात १९८२ साली झालेली दिसते. त्यांची फकीरा ही कादंबरी २८ भाषेतून प्रकाशित झालेली दिसून येते यावरून त्याची लोकप्रियता, त्या साहित्यकृतीचा दर्जा लक्षात येतो. या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला होता. ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेली आहे. बाबासाहेबांची कोणती लेखणी. तर ती संविधान लिहिलेली लेखणी होती हे लक्षात घ्यावे. फकीराची अर्पण पत्रिका आणि जग बदल घालूनी घाव हे प्रेरणा गीत हे दोन दुवे या दोन जातींना एकत्र आणण्याचा एक महत्त्वाचा वैचारिक धागा आहे असे नमूद करावेसे वाटते.

**– प्रा. डी.डी. मस्के**
**बार्शी, मो.न.९४२३६०९२१८, ९८८१४२६९३३**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# रोहन पैठणकर प्रकरणातील आरोपींवर मकोका लावा

## मेहकरातील भीमसैनिक आक्रमक; रस्ता रोको करून केले आदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : बूलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे दलीत तरून रोशन पैठणकर दलीत तरूणाचे अपहरण करून त्याला कॉग्रेस न प मैदात नेवून बेदम मारहान करण्यात आली. एव्हड्या वरच हे जातीवादी सैतान थांबले नाहीत तर त्याचा धर्म विचारून त्याला विवरत्र केले त्याचा व्हीडीओ काढून तो प्रसारीत केला.व या दलीत तरूणावर जिव घेणा हल्ला केला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपीवर मकोका लावा. अशी मागणी मेहकरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी केली आहे.

या संदर्भात दिनांक ३० जूलै २०२५ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर वाटीके समोरील मेहकर बूलढाणा रोडवर भीमसैनिकांनी रस्तावर येवून जोरदार निर्दशने केली व काही काळ रस्ता रोखून धरला.डॉ बाबा साहेब आंबेडकराचा विजय असो, सविधानाचा विजय असो, रोहन पैठणकर यांच्यावर हल्ला करणा-या जातीवाद्यावर मकोका कायद्या अर्तगत कठोर कारवाई झालीच पाहिजे, झेंडा प्रकरणातील वेणी सूलतानपूर येथील बौध्द बांधवावरील गून्हे तात्काळ मागे घेतलेच पाहीजे, अशा गगणभेदी घोषनांनी परीसर दनाणून सोडला.

या आंदोलनात आंबेडकरी चळवळीचे भाई कैलास सुखधाने,जेष्ठ नेते सोपाणदादा देबाजे,प्रा डि एस वाघ, यूवा नेते संघपाल पनाड, तथागत ग्रूपचे संस्थापक अध्यक्ष संदिपदादा गवई,सिध्दांत वानखेडे, प्रा गजेंद्र गवई,भास्करराव गवई, लहूशक्तीचे प्रदिप कांबळे,भारत मूक्ती मोर्चाचे भागवतराव जाधव, मा नगरसेवक सुरेश मानवतकर,भूमी मूक्ती मोर्चाचे भीमराव खरात,आण्णाभाऊ साठे फोर्सचे प्रभाकर आवारे, वंचितचे प्रा आबाराव वाघ,ॲ बबनराव वानखेडे,राधेशाम खरात, कलावंतांचे प्रतीनिधी दूर्गादास काटे, शाहीर संघपाल गवई. शाहीर देवानंद वानखेडे. डॉ बाबासाहेब आबेडकर सह पथ संस्थेचे अध्यक्ष तथा मा उपअभीयंता






विजय खिल्लारे, कामगार नेते विजयराव सपकाळ,नाना साहेब देबाजे, दादासाहेब गवई,जमाते हिंदचे जब्बारखान,जनाब सिकंदर मौलान,पत्रकार रफीक कूरेशी, टिपू सूलतान ग्रूपचे यूणूस पटेल, छोटूभाई गवळी, रियाजभाई कूरेशी ,रविंद्र वाघ,पत्रकार गजानन सरकटे,सूनिल मोरे, संतोष जाधव,आम आदमी चे भानूदास पवार,ईले. मिडीयाचे ऊध्दव फंगाळ,प्रदिप सरदार,अमित काकडे, बौध्दाचार्य सुरेश पवार, प्रकाश सुखधाने,एच एस वाघ, गणेशराव गवई, गजानन जाधव,मोहन सुखधाने,मंगेश वानखेडे,समाधान देवकूळे संजय कळसकर, भीमराव गवई,मोहन अंभोरे, संदिप बोरकर,मा प स सदश्य दिलीप खरात, बाळू वानखेडे,समाधान चव्हान, कविराज पाखरे, समाधान सरदार,सतीष इंगळे, अभीधम्म विहार समीतीचे एस बी गवई, प्रकाश पवार सर, बळीभाऊ मोरे, दिपक अभोरे,सूनिल ईंगळे, रवी वाघमारे, कैलास जाधव, संजय वाघमारे,किरण पनाड, बेंबीसार पनाड, प्रसेंजीत पनाड, शुभम जावळे, विशाल पनाड, संदेश पनाड,शोभाबाई वाघमारे,लिलाबाई कटारे, शोभाबाई जाधव,लताबाई जाधव,वर्षाताई जाधव,,नयनाबाई कटारे,तारामतीबाई गवई, वच्छलाबाई गवई,लीलाबाई डोंगरदिवे,यांचे मेहकर लोणार तालूक्यातील आंबेडकरी चळवळीतील शेकडो महिला पूरूष,नेते कार्यकर्ते मोठ्या संख्येने ऊपस्थित होते. आंदोलनाला मेहकर पोलीस स्टेशनचे ठानेदार आलेवार यांनी कडक बदोबस्त ठेवला होता.



# तुगत विकास सोसायटीवर मा.आ. परिचारक गटाचे वर्चस्व कायम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तुंगत तालुका पंढरपूर येथील विविध विकास कार्यकारी सेवा सोसायटीच्या पंचवार्षिक संचालक मंडळ निवडणुकीत मा.आ. प्रशांत परिचारक गटाचे माजी सरपंच आगतराव रणदिवे यांच्या नेतृत्वाखाली श्री तुंगेश्वर शेतकरी विकास पॅनलचे सर्व १३ जागावर विजय मिळवत आपले वर्चस्व कायम ठेवले तर विरोधी आमदार अभिजीत पाटील ,प्रकाश पाटील, कल्याण काळे ,या गटाला पराभव पत्करावा लागला.

पंढरपूर तालुक्यातील पूर्व भागातील राजकीय दृष्ट्या कायम चर्चेत असणाऱ्या तुंगत विविध कार्यकारी सेवा सोसायटीवर माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे गेल्या १४ वर्षापासून अबाधित वर्चस्व आहे मात्र काल पार पडलेल्या निवडणुकीत पूर्वीचे परिचारक गटात आघाडी असणारी गट यावेळेस परिचारक गटाच्या विरोधात जाऊन आमदार अभिजीत पाटील प्रकाश पाटील कल्याण काळे यांच्या गटाने निवडणुकीत यश मिळवण्यासाठी मोठी कंबर कसली होती.

काल रविवार दिनांक १७ जुलै रोजी पार पडलेल्या सोसायटी निवडणुकीमध्ये परिचारक गटाने माजी सरपंच आगतराव रणदिवे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या मताधिक्याने ही निवडणूक जिंकत विरोधी गटाचा धुवा उडवला व विजय गटाने मोठ्या आताच बाजीत जल्लोष साजरा केला.

**तुंगेश्वर शेतकरी विकास पॅनलचे विजयी उमेदवार**

आनंद आंध, बाळू आंद, शिवाजी नागणे, नारायण पवार, खंडेराव रणदिवे, गणपत रणदिवे, महादेव ब्रह्मदेव रणदिवे, सुनंदा कदम, ऐश्वर्या रणदिवे, संतोष वन्साळे, शब्बीर मुलानी, बाबासो कोळेकर, पॅनलचे उमेदवार विजयी करण्यासाठी माजी आमदार प्रशांत परिचारक, श्री विठ्ठल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष युवराज पाटील आदींनी सर्वांचा पुष्पहार शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नळदुर्ग बसस्थानक येथे चोवीस तास वहातुक नियत्रंकाची सेवा उपलब्ध करावी : भाजपा सोशल मिडीया सेल सह प्रवासी जनतेची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : धाराशिव जिल्ह्यातील परिवहन महामंडळच्या तुळजापूर आगार अंतर्गत येणाऱ्या नळदुर्ग बसस्थानक २४वाहतूक नियंत्रक सेवा उपलब्ध करावी असी मागणी भाजपा सोशल मिडीया सेल चे तुळजापूर तालूका अध्यक्ष व संयोजक किशोर धुमाळ सह प्रवाशी जनतेतून होत आहे.



या संदर्भात विभागीय नियंत्रक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ विभागीय कार्यालय धाराशिव याना एक लेखी निवेदन देण्यात आले असुन त्यात म्हटले की तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग हे मुंबई ते हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर वसलेले ऐतिहासिक शहर असून जवळपास ६५ गावांच्या केंद्र स्थानी आहे. देशभरात कोठेही जायचे असेलतर नळदुर्ग बस स्थानकावरचं यावे लागते. त्यामुळे या बस स्थानकावर प्रवासांची नेहमी वर्दळ असते. रात्रीच्याही वेळी या बसस्थानकावरून लांबपल्याच्या पंधरा ते वीस बसेस ये जा करतात. त्यामुळे या ठिकाणी चौवीस तास वाहातुक नियंत्रकाची गरज आहे. तसेच या ठिकाणी अगाऊ आरक्षणाची सोय नसल्याने प्रवासाना अगाऊ आरक्षणासाठी उमरगा किंवा तुळजापूरलाचं जावे लागते त्यामुळे सामान्य प्रवाशाना नाहक अर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.तरी या बस स्थानकावर अगाऊ अरक्षणाची सोय करावी असी ही मागणी करण्यात येत आहे.या निवेदनावर भाजपा कार्यकर्ते व किसान मोर्चा अध्यक्ष अंगद जाधव, सरचिटणीस कल्याण बिराजदार सुनील सुर्यवंशी जाधव मेजर सह कार्यकर्त्यांच्या सह्या असून आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिलेले शिफारस पत्र ही जोडण्यात आले आहे. सदर मागणीचे निवेदन संबधित परिवहन मंत्री नामदार प्रताप सरनाईक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे मुख्यालय सेंट्रल ऑफीस मुंबई यानाही पाठविण्यात आले आहे.

# मंगळवेढ्यातील गजानन लोकसेवा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत ६० रुग्णांच्या मणक्याच्या मोफत यशस्वी शस्त्रक्रिया

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा शहरातील चोखामेळा चौक येथे असलेले गजानन लोकसेवा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत ६० रुग्णांच्या मणक्याच्या मोफत शस्त्रक्रिया झाल्याची माहिती डॉक्टर प्रवीण सारडा यांनी दिली आहे.




विजापूर, सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा, सोलापूर जिल्ह्यातील अधिभागातील या रुग्णांना मोठा लाभ झाला आहे जवळपास लाखो रुपयांची रुग्णांची बचत होऊन मोफत यशस्वी केल्या करण्यात आल्या आहेत.

गजानन लोकसेवा हॉस्पिटलची संचालक डॉक्टर प्रवीण सारडा यांनी भारतातील व विदेशातील उत्कृष्ट इन्स्टिट्यूट मधून आपली ऑर्थोपेडिक ची ट्रेनिंग घेणारे ते उत्कृष्ट डॉक्टर आहेत.

गोरगरीब कुटुंबातील अनेक रुग्णांना मोफत शस्त्रक्रिया करून डॉक्टर प्रवीण सरळ यांनी जीवदान देण्याचे काम केले आहे.

आता सर्व नागरिकांना अचूक निदान व योग्य उपचार मणक्याच्या व हाडाच्या किचकट शस्त्रक्रिया सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया करून उत्तम उपचार मान पाठ कमरेच्या सर्व मणक्याच्या हाडाच्या सर्व जागा राहून उपचार व शस्त्रक्रिया गजानन लोकसेवा हॉस्पिटलमध्ये मोफत केल्या जाणार आहेत.

गजानन लोकसेवा हॉस्पिटल येथे सर्व स्पेशालिस्ट तज्ञ डॉक्टर उपलब्ध असून सर्व रोगांच्या शस्त्रक्रिया उपचार मोफत केले जाणार आहेत गजानन लोकसेवा हॉस्पिटलची संचालक डॉक्टर प्रवीण सारडा यांनी भारतातील व विदेशातील उत्कृष्ट इन्स्टिट्यूट मधून आपली ऑर्थोपेडिक ची ट्रेनिंग घेणारे उत्कृष्ट डॉक्टर आहेत गजानन लोकसभा हॉस्पिटलमध्ये जनरल मेडिसिन ऑर्थोपेडिक कन्यूरोलॉजिस्ट निरो सर्जरी गॅस्ट्रो एस्ट्रोलॉजी प्लास्टिक सर्जरी जॉईंट रिप्लेसमेंट सर्जरी, जनरल लॅप्रोस्कोपी सर्जरी, नेफ्रोलॉजी ,यूरोलॉजी क्रोमेटॉलॉजी, मेडिकल ऑन नोलोजी, सर्जिकल टेक्नॉलॉजी रेडी बालाजी आणि इमेजिंग स्क्रीन अँड व्हिडी मायक्रोबायोलॉजी फिजिक व स्पीच थेरपी आदी विभाग उपलब्ध आहेत.

उपलब्ध सेवा

ऑपरेशन थेटर्स, आय सी यु सुसज्ज कॅश ज्युनिटी २४ तास पॅथॉलॉजी व मायक्रोबायोलॉजी व डिजिटल इमेजिंग व रेडिओलॉजी किडनी डायलिसिस युनिट व डायबेटिक केअर युनिट पी. एफ. टी. सी आय. सेंट्रल ऑक्सिजन सेंट्रल सेक्शन व सर्व सुविधांना युक्त ड्रामा म्बुलन्स २४ तास औषध दुकान ऑटोमॅटिक जनरेटर बॅकअप आधी सेवा दिल्या जात आहेत.

# युट्यूपियन शुगरचे संस्थापक चेअरमन उमेश परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अक्षय ब्लड सेंटर व येटोपियन शुगर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक, अक्षय ब्लड बँकेचे डॉक्टर उदय पाटील व जनसंपर्क अधिकारी सागर जाधव यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी युट्युबिन शुगरचे खाते प्रमुख कर्मचारी अधिकारी उपस्थित होते. सदर या शिबिरात १०१ रक्तदात्यांनी सौभाग घेतला व यावेळी बोलताना रोहन परिचारक म्हणाले की सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या युट्युबियन




शुगरचे दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवली जातात. रक्तदान हे श्रेष्ठदान असलेली अशा प्रकारची शिबिरे आयोजित करणे हे कौतुकास्पद आहे. रक्तदान हे असे विधान आहे की ज्यामुळे एकता एखाद्या व्यक्तीचा प्राण ही वाचू शकतो रक्तदान हे सामाजिक जबाबदारीचे काम आहे. हे काम .प्रत्येक निर्णय करायला हवे. कारखान्याची संस्थापक चेअरमन उमेश परिचारक त्यांना दीर्घायुष्य लाभावी अशी श्री विठ्ठल रुक्मिणी व श्री संत दामाजी यांच्या चरणी प्रार्थना करतो व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो व अशी उपस्थित रक्तदात्यांचे आभार मानतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ईडीपी मॅनेजर अभिजीत यादव यांनी मांडले.

**निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील**

**समाज कल्याण विभागांतर्गत असलेल्या जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक**

# पोलीस विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : अनुसूचित जाती/ जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत पोलीस विभागाकडे कार्यवाहीसाठी प्रलंबित असलेल्या एकूण प्रकरणांची संख्या ५१ इतकी आहे. यात शहर पोलीस कडे ९ व ग्रामीण पोलीस कडे ४२ गुन्हे प्रलंबित आहेत. तरी पोलीस विभागाने पुढील बैठकीपूर्वी प्रलंबित गुन्ह्याची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या दालनात आयोजित जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या आढावा बैठकीत श्री. पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, समितीचे अशासकीय सदस्य महादेव पाटील यांच्यासह पोलीस विभाग व अन्य संबंधित विभागाचे अधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी श्री पाटील म्हणाले की अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ संशोधित २०१५ अंतर्गत गुन्ह्यातील पिढी त्यांना शासकीय नियमने मंजूर असलेले अर्थसहाय्य वेळेत मिळणे आवश्यक आहे. यासाठी समाज कल्याण विभागाने शासन स्तरावर पाठपुरावा करून अर्थसहाय्य साठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून घ्यावा. व माहे जानेवारी २०२१ ते जून २०२५ या कालावधीत अर्थसाहयासाठी प्रलंबित असलेल्या १६९ प्रकरणातील पिडीतांना वेगाने अर्थसहाय्य मिळेल यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सुचित केले.

प्रारंभी समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती सोनवणे यांनी मागील बैठकीतील इतिवृत्ताचे वाचन केले. तसेच या बैठकीत ठेवण्यात आलेल्या विषयांची माहिती दिली. पोलीस विभागाकडे कार्यवाहीस प्रलंबित असलेल्या प्रकरणांच्या कारणांमध्ये आरोपी अटक करणे आणि अधिक तपास, साक्षीदार तपासणी करणे या दोन कारणांच्या प्रामुख्याने समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. त्याप्रमाणेच या अंतर्गत पीडितांना अर्थसहाय्य देण्यासाठी समाज कल्याण विभागाकडे दोन कोटीच्या निधीची मागणी करण्यात आलेली असून यामध्ये ५० टक्के हिस्सा केंद्रशासन व ५० टक्के हिस्सा शासनाचा आहे. हे अनुदान प्राप्त झाल्यानंतर तात्काळ संबंधित पिडीतांच्या बँक खात्यावर निधी जमा करण्यात येणार असल्याची माहिती श्रीमती सोनवणे यांनी यावेळी दिली.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रतिमेला मंगळवेढा येथे जोडे मारो आंदोलन व प्रतिमेचे दहन

## ...तर त्याच ठिकाणी काँग्रेसकडून शिंदे यांच्या प्रतिमेवर दुग्धाभिषेक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

खासदार प्रणिती शिंदे यांनी संसदीय अधिवेशनात ऑपरेशन सिंदूर हा केवळ असे वक्तव्य केल्याने पडसाद मंगळवेढ्यात उमटले व भाजपच्या वतीने मंगळवेढा शहरात त्यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध करण्यात आला.

दामाजी चौक येथे प्रणिती शिंदे यांच्या विरोधात घोषणाबाजी करत प्रतिमेला जोडे मारून व प्रतीकात्मक प्रतिमा दहन करून तीव्र भावना व्यक्त केल्या.

निषेध आंदोलनात प्रणिती शिंदे मुर्दाबाद, उपनिधी शिंदे शर्मा करू भारत की जय भारतीय सैन्य दलाच्या विजय असो अशा घोषणा देण्यात आले.

भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सुदर्शन यादव यांनी प्रणिती शिंदे या आपल्या मतदारसंघाच्या खासदार आहेत याची आज खंत वाटत आहे ज्या ऑपरेशन सिंदूरला जगाने मान्य केले आहे.

त्याला नाकारणे म्हणजे तमाम देशभक्तांच्या भारतीय सैन्य दलाचा अपमान आहे ज्याच्या वडिलांना भगवा दहशतवाद वाटतो त्याच पद्धती शिंदे यांनी आज सैन्याचा अपमान केलेला आहे हे आंदोलनात भाजप जिल्हा उपाध्यक्ष संतोष मोगले शहराध्यक्ष नागेश डोंगरे ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष विवेक खिलारी युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस सुनील कांबळे जिल्हा उपाध्यक्ष युवराज कोळी युवा मोर्चाचे राधे सुशांत हजारे उपस्थित होते.

सायंकाळी काँग्रेसकडून त्याच ठिकाणी प्रतिमेवर दोगदापेक्षा करून



खासदार पणेती शिंदे यांची मंगळवेढा भाजपने प्रतिमा दहन केल्याची पडसाद मंगळवेढ्यात उमटली काँग्रेसच्या वतीने प्रणिती शिंदे यांच्या प्रतिमेस सायंकाळी दुग्धाभेशक घालून त्यांचा समर्थनार्थ जय जयकार करायची घोषणा दामाजी चौकात दिल्या व गेल्या संसदेत भाजपची कोंडी केल्याचे समर्थन केले.

कारण शिंदे यांनी लोकसभेमध्ये ऑपरेशन शेंदूर बाबत प्रश्न विचारतात भाजप सरकारची कोंडी केल्याने मंगळवेढा भाजप पदाधिकाऱ्यांनी खासदार शिंदेच्या विरोधात घोषणा देत दामाजी चौक दुपारी आंदोलन केले होते.

यावेळी शहराध्यक्ष अँड राहुल घुले म्हणाले की खासदार पणिती शिंदे यांनी लोकसभेमध्ये भाजपच्या मोठ्या देश प्रेमाने आणि हिंदुत्वाचा बुरखा फाडला त्यामुळे भाजपला पोटसूळ खासदार शिंदे यांना बदनाम करण्यासाठी जे आंदोलन केली आहे त्याचा निषेध म्हणून प्रति आंदोलन करण्यात येत आहे. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष नंदकुमार पवार मतदारसंघाचे अध्यक्ष भारती वाकडे तालुका अध्यक्ष प्रशांत साळे रविकिरण कोळेकर सिद्धेश्वर घसाडे, शेख पंडित पाटील मुबारक शेख इत्यादी उपस्थित होते

# सिंदखेडराजा तालुका काँग्रेस किसान सेलच्या तालुका अध्यक्षपदी पांडुरंग शिंगणे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील राजकीय क्षेत्रात अग्रेसर असणारे शेंदुरजन सारख्या गावातुन अनेक नेते मंडळी कॅबीनेट मंत्री. व जिल्हा परीषद सभापती.पंचायत सभापती या पदावरती काम केले आहे. सिंदखेडराजा तालुक्यात काँग्रेस पक्ष मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ. बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष चिखली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी.शेतकरी कष्टकरी यांचे नेतृत्व करण्यासाठी . शेंदुरजन येथील प्रतिष्ठित .शेतकरी पांडुरंग शिंगणे यांना सिंदखेडराजा तालुक्यांत मोठा मानणारा वर्ग व सातत्याने अनेक प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी सर्कीय पाहून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस



कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ .व बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्या आदेशानुसार . बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमेटी किसान सेल चे जिल्हा अध्यक्ष संभाजी सिर्के यांनी सिंदखेडराजा तालुका काँग्रेस किसान सेल च्या तालुका अध्यक्ष पदावर पांडुरंग शिंगणे यांची नियुक्ती करण्यात आली काँग्रेस पक्षाला सिंदखेडराजा तालुक्यात बळकटी येण्यासाठी .व पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी पांडुरंग शिंगणे . यांना बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. उपस्थित बुलढाणा जिल्हा परिषद सदस्य तथा महिला व बाल कल्याण सभापती अशोक पडघान . चिखली कृषी उत्पन्न बाजार समिती चे माजी सभापती डॉ सत्येंद्र भुसारी व अनेक नेते मंडळी उपस्थित होते.

कांग्रेस किसान सेल च्या तालुका अध्यक्ष पदी पांडुरंग शिंगणे यांची निवड झाल्याबद्दल तालुक्यातील अनेक चाहता वर्ग असेल्याने त्यांच्या वर शुभेच्छांचा व अभिनंदन चा वर्षाव होत आहे.



# कर्ज फेडणे कर्तव्य, संस्था प्रगतीसाठी सहकार गरजेचा : जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे

**■ अहिल्यानगरच्या सहकाराला शिस्त हवी: वेळेवर कर्ज फेडा – जिल्हा उपनिबंधक सुरवसे**
**■ पतसंस्थांच्या ठेवीदारांना न्याय मिळेल: गैरव्यवहार खपवून घेणार नाही – उपनिबंधक सुरवसे**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अहिल्यानगर : कर्ज घेणे हे प्रगतीचे लक्षण असले, तरी घेतलेल्या कर्जाची वेळेवर परतफेड करणे हे बाजारातील आपली पत वाढवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी केले. शेतात खत, नाकात नथ, बाजारात पत ही म्हण अधोरेखित करत त्यांनी आर्थिक शिस्तीचे महत्त्व स्पष्ट केले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ आणि दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने डॉ. विश्वासराव आरोटे यांनी मंगेश सुरवसे यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचा सत्कार केला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी दैनिक समर्थ गांवकरी समूहाचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर उपस्थित होते.

**अहिल्यानगर जिल्ह्याचे सहकार क्षेत्रातील योगदान**

अहिल्यानगर जिल्ह्याने सहकार क्षेत्राला नेहमीच दिशा दिली आहे. या जिल्ह्यात साखर कारखाने आणि पतसंस्थांचे मोठे जाळे आहे. राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षाही पतसंस्थांमध्ये ठेवी ठेवण्याला ठेवीदार आजही प्राधान्य देतात, असे सुरवसे यांनी नमूद केले. सहकार चळवळ ही बळीराजाला प्रगतीकडे नेणारी असून, महाराष्ट्राला नवी आशा आणि दिशा देण्याचे काम सहकार संस्थांनी केले आहे, असेही ते म्हणाले.

**संस्थांच्या प्रगतीसाठी एकत्रित प्रयत्न आवश्यक**

संस्थांनी प्रगती साधण्यासाठी संचालक मंडळाने खर्चाला फाटा देऊन प्रयत्न करावेत, असे आवाहन सुरवसे यांनी केले. त्याचबरोबर, सभासदांनीही संस्थेतील आपले व्यवहार पारदर्शक आहेत की नाही, याची माहिती घेत राहणे महत्त्वाचे आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहून जिथे अडचण वाटते, तिथे तात्काळ विरोध करावा. जोपर्यंत सभासद संचालकांना प्रश्न विचारत नाहीत, तोपर्यंत संस्था सुरळीत चालणार नाही, हे त्यांनी ठामपणे सांगितले.

ठेवीदारांचे हित जपणार, गैरव्यवहार खपवून घेणार नाही. अहिल्यानगर जिल्ह्यातील पतसंस्थांमध्ये आजही गोरगरीब जनतेच्या ठेवी आहेत. मुदत संपल्यानंतर ठेवी परत करणे संस्थांवर बंधनकारक असताना, अनेक ठिकाणी ठेवी मिळत नसल्याच्या तक्रारी लेखी स्वरूपात प्राप्त झाल्या आहेत. अशा तक्रारींवर निश्चितच कठोर कारवाई केली जाईल आणि कोणाचीही गय केली जाणार नाही, असा इशारा सुरवसे यांनी दिला. संस्था अत्यंत महत्त्वाची असून, कर्ज घेतल्यानंतर ते फेडणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असे त्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केले.

**सहकार विभागाचे बारकाईने लक्ष**

सध्या सहकारी विभागाचे प्रत्येक विविध कार्यकारी सोसायटी, पतसंस्था आणि इतर विविध संस्थांवर बारकाईने लक्ष आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार देखील या संस्थांवर लक्ष ठेवून आहे, असे सुरवसे यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांच्या विकासासाठी सहकार संस्थांचा पुढाकार**

सहकार संस्थांनी विविध व्यवसाय सुरू केल्यास शेतकऱ्यांचा नक्कीच विकास होईल. सभासदांना देखील अनेक योजना या संस्थांच्या माध्यमातून देण्यासाठी पुढाकार घ्यावा. जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्ज वितरण केले जाते. शेतकरी देखील आपल्या शेतीला जोडव्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसायाकडे वळले आहेत. प्रत्येकाने कर्ज भरणे हे आपले कर्तव्य समजून, मी संस्थेचा मालक आहे, संस्था माझी आहे या भावनेने आर्थिक व्यवहार केल्यास आपली पत वाढेल आणि संस्था प्रगतीपथावर जाईल. शासन शेतकऱ्यांसाठी विविध योजना आणत असताना, त्या प्रत्येक योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे हे प्रत्येक सचिवाचे काम आहे. संस्था पुढे नेण्यासाठी संचालक मंडळ आणि त्या संस्थेचा सचिव हे दोन्ही घटक तेवढेच महत्त्वाचे आहेत, असेही मंगेश सुरवसे यांनी स्पष्ट केले.

# बोळदे कवठा येथे प्रयोग : महिला सक्षमीकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
बाराभाटी :



राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत मौजा –बोडदे/कवठा या ठिकाणी आज तालुका कृषी अधिकारी अर्जुनी मोरगाव तथा तालुका व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत ग्रामपंचायत स्तरीय जनजागृती कार्यक्रम तथा ओरिएंटेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

सदर कार्यक्रमास मा. सौ सुलक्षणा पाटोळे, तालुका कृषी अधिकारी अर्जुनी मोरगाव यांनी नैसर्गिक शेती करणे का? महत्वाचे आहे तथा नैसर्गिक शेतीचे विविध फायदे, बाह्य निविष्ठांचा वापर न करता शेती करणे, रासायनिक खते, किटकनाशके इत्यादी चा वापर थांबविणे, जमिनींची सुपिकता वाढविणे इत्यादी विषयी मार्गदर्शन केले. श्री आदर्श मेश्राम, उपकृषि अधिकारी नवेगाव बांध यांनी जीवामृत तयार करणे, कृषि विभागाच्या विविध योजना या विषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रुती शहारे, प्रमुख पाहुणे सुरेश राऊत उपस्थित होते.

दिगांबर कु–हाडे (कृषि व्यवस्थापक) संसाधन व्यक्ती यांनी जीवामृत, बिजामृत दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क तयार करणे, मातीचे आरोग्य सुधारणे, कृषीताई मनीषा शहारे, यांनी अझोला चा वापर करणे इत्यादी विषयी मार्गदर्शन केले.

विलास गहाणे, सहाय्यक कृषी अधिकारी, यांनी बीआरसी स्थापण करणे, नैसर्गिक शेती करणारे शेतकरी यांचे प्रमाणिकरण करणे , तथा गटातील शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या बाबी विषयी मार्गदर्शन केले..

सौ संगिता किरसान कृषि सखी आणि गावातील महिला शेतकरी आणि बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. अल्पोपहार वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# कै.भास्करराव शिंगणे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : १२ फेब्रुवारी रोजी झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, या परिक्षेत कै. भास्करराव शिंगणे विद्यालय दरेगाव तालुका सिंदखेडराजा येथील विद्यार्थी व विद्यार्थिनी ने उज्वल यश मिळवले आहे. इयत्ता आठवीची विद्यार्थीनी श्रावणी मुरलीधर केंधळे हि सिंदखेडराजा तालुक्यातून तिसरा क्रमांकावर शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरली आहेत. त्याचबरोबर गुणवत्ता यादीमध्ये खुशी सुनील काळे.कार्तिक गणेश देशमुख.तुषार समाधान बंगाळे. प्राची संजय साबळे .भक्ती प्रकाश डोंगरे .नमन सुनील साबळे.हर्षल शंकर गिरी . कार्तिक समाधान गाडे.या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

**सिंदखेडराजा तालुक्यातून श्रावणी मुरलीधर केंधळे शिष्यवृत्ती परीक्षेत तिसऱ्या क्रमांकावर**



शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या भविष्यातील येऊ घातलेल्या अनेक स्पर्धा परीक्षेंचा पाया असतो. शिष्यवृत्ती परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे बाळकडूच या लहान वयापासूनच मिळत असते. नेमक्या याच बाबींचा पाया पक्का व्हावा, या उद्देशाने पुणे येथील महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दरवर्षी राज्यात पूर्व उच्च प्राथमिक इयत्ता पाचवी व माध्यमिक इयत्ता आठवी च्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन केले जाते.

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये कै भास्करराव शिंगणे विद्यालय दरेगाव चे इय्याता आठवीच्या विद्यार्थ्यी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी नऊ विद्यार्थी पात्र झाले असून . कै.भास्करराव शिंगणे विद्यालयाच्या वतीने पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

**कल्याण येथील कार्यालयावर काढला मोर्चा**

**वरिष्ठ जिल्हा समन्वयकांना दिले निवेदन**

# कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी धरणे आंदोलन







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव

महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या योजना बचत गटाच्या माध्यमातून घरोघरी पोचविणाऱ्या शहापूर आणि भिवंडीमधील महिला कर्मचाऱ्यांना तीन हजार मानधन दिले जात असून उर्वरित मानधन त्यांनी इतर उत्पन्नातून मिळविण्याची अट घातली आहे. या जाचक अटीविरोधात तसेच विविध प्रलंबित मागण्यासाठी या महिलांनी कंत्राटी कर्मचारी संघाच्या माध्यमातून महिला आर्थिक विकास महामंडळाचे ठाणे जिल्हातील कल्याण येथील कार्यालयावर मोर्चा काढला होता. वरिष्ठ जिल्हा समन्वयक अधिकारी संजय गर्जे यांना निवेदन दिले.

राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेले महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे काम तालुका स्तरावर कम्युनिटी मॅनेजमेंट रिसोर्स सेंटरच्या माध्यमातून चालवले जाते. शहापूर आणि भिवंडी तालुक्यात सीएमआरएसच्या ८८० महिला कर्मचारी महिला सक्षमीकरणासाठीचे उपक्रम राबवतात. मात्र, इतर तालुक्यात हे काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना ६ हजार मानधन दिले जात असताना शहापूर आणि भिवंडी तालुक्यातील कर्मचाऱ्यांना ४० टक्के मानधन देण्यात येते. उर्वरित मानधन इतर उत्पन्नातून मिळविण्याच्या सूचना त्यांना दिल्या जातात. अन्य तालुक्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांप्रमाणे आपल्यालासुद्धा संपूर्ण मानधन मिळावे, त्याचबरोबर कर्मचाऱ्यांना अपघाती विमा योजना, भविष्य निर्वाह निधी योजना तसेच ठराविक वर्षे अखंड सेवा केल्यानंतर आत्मसन्मान निधी दिला जावा अशी मागणी या महिलांनी आंदोलनाच्या माध्यमातून केली आहे. महिलांनी दिलेले निवेदन वरिष्ठांना पाठवले जाईल. वरिष्ठ पातळीवरूनच हा प्रश्न सोडविणे शक्य असल्याचे गर्जे यांनी बोलतांना सांगितले.

# विद्यार्थी गुणगौरव सोहळा व तालुका समाज मेळाव्यात गुणवंतांचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी : श्री दशनाम गोसावी समाज संस्था, सिन्नर यांच्या वतीने आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळा व तालुका समाज मेळावा नुकताच सिन्नर येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रविंद्र गिरी होते.या सोहळ्यास माजी जिल्हाध्यक्ष सूर्यभान गोसावी, बाळासाहेब गोसावी, संजय गोसावी व किशोर भारती हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. समाजातील शिक्षण व यशाची ओळख ठरलेल्या या सोहळ्यात इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती पात्र (४), दहावी (१८ ), बारावी (११) तसेच पदविका, पदवी व पदव्युत्तर (१५) अशा एकूण ४८ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना रामभारती गोसावी यांनी स्मृतिचिन्ह, भानुदासपुरी गोसावी यांनी शैक्षणिक साहित्य आणि भैरवनाथ गोसावी यांनी प्रमाणपत्रांचे सौजन्य दिले. काशिनाथ गोसावी, कमल गिरी व दीपक गोसावी यांनी रोख स्वरूपातील पारितोषिक देवून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवलेल्या समाजबांधवांचाही गौरव करण्यात आला. दत्तात्रय गोसावी (समाजभूषण), सोमनाथ गिरी (आदर्श शिक्षक), संजय गिरी (जिल्हा सरचिटणीस, ग्रामसेवक संघटना), डी. झेड. बन (ग्रामविकास अधिकारी), सुमित गोसावी



(महाराष्ट्र पोलीस), प्रवीण व संदीप गोसावी (उद्योजक), भूषण गोसावी (भारतीय जवान), संजीव गोसावी (कृषी अधिकारी), सोनाली गिरी (शिक्षण सेवक) व दिलीप गोसावी (सेवानिवृत्त) यांचा सन्मान स्मृतिचिन्ह देवून करण्यात आला. या सोहळ्यासाठी सुरेश गोसावी, सुकदेव गोसावी, दत्तात्रय गोसावी, डॉ. अशोक गोसावी, शरद गोसावी, गुलाब गोसावी, संजय गिरी, डि.झेड. बन, पंडित गोसावी, संजय गोसावी, दौलत गोसावी, छगन गोसावी, विठ्ठल बावा, अनिल गोसावी, सुभाष गोसावी, अंबादास भारती आदींनी रोख स्वरूपात दिलेल्या देणग्यांमुळे कार्यक्रम अधिक भव्यतेने साजरा झाला.रविंद्र गिरी यांच्या वतीने सर्व उपस्थित समाजबांधवांना स्वादिष्ट भोजन देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सरचिटणीस वसंत गोसावी यांनी केले. ओंकारेश्वर आरती पठणाने या प्रेरणादायी कार्यक्रमाची सांगता झाली. हा सोहळा समाज एकतेचे प्रतीक ठरून, पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.